सहसंचालक उच्च शिक्षण
अमरावती विभाग अमरावती
दूरध्वनी क्रमांक 0721-2531235

संस/उशि/अम/शिष्यवृत्ती/13/ 3134 दिनांक 31/07/2013

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक/संस्था प्रमुख
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत विनअनुदानीत महाविद्यालय,
ज्युनिअर कॉलेज,डि.एड.बी एड,एम एड कॉलेज , आय टि आय,एमसीव्हिसी,
पॉलीटेकनिक कॉलेज
अमरावती विभाग अमरावती

उपरोक्त विषयास अनुसरुन आपल्या महाविद्यालयात शिकत असलेल्या संबंधीत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती सूचनाफलकावर देवून त्यांचेकडून विहित दिनांकाचा आत शिष्यवृत्तीचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने भरुन घेवून दिलेल्या दिनांकास न चूकता व विनाविलंब जाहिरातीमध्ये दिलेले सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग अमरावती येथे सादर करण्यांत यावे.

## केद्रं शासन पुरस्कृत अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठीची मॅट्रिकोत्तर (पोस्ट मॅट्रिक)शिष्यवृत्ती योजना सन २०१३-२०१४

मुस्लीम, ख्रिचन,बौध्द,पारशी ,शिख या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर (पोस्ट मॅट्रिक) शिक्षणासाठी केद्रं शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (पोस्ट मॅट्रिक) शिष्यवृत्ती योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोयीस्करपणे उपलब्ध व्हावा आणि तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा, यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम**

११ वी ते पी एच डी /व्यावसायीक /डी एड /बी एड/ एम एड/ इत्यादी तसेच सर्व आय टी आय एनसीव्हि टी /सर्व डिप्लोमा व अकरावी/ बरावी स्तरावरील एमसीव्हिसी अभ्यासक्रम

पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानूसार पात्र इच्छूक विद्यार्थ्यांनी www.momascholarship.gov.in या संकेत स्थळावरुन ऑन लाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने वरील संकेतस्थळावरुन स्वत: आवश्यक ती माहिती भरुन स्वत:चा युजर आय डी तयार करुन घ्यावा.

अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून आपल्या महाविद्यालय/संस्थेमध्ये पुढील कार्यवाहीसाठी सादर करावी.

**प्राचार्यांनी तो अर्ज ऑन लाईन सिस्टीममध्ये आणावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.**

**अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.**

अर्जावर विद्यार्थ्याचे पासपोर्ट फोटो दहावी पासून उतीर्ण सर्व परिक्षांच्या गुणपत्रिकांची सांक्षकिंत प्रत , शिद्यापत्रिकेची प्रत,विज/दुरध्वनी देयकाची प्रत,पापपत्रची प्रत, निवडणूक ओळखपत्र यापैकी एक पुरावा.अल्पसंख्याकदर्जाबाबतचे व पालकांचे सन २०१२-२०१३ चे वार्षिक उत्पन्न स्वंयंघोषित घोषणापत्र रेव्हेन्यु स्टॅम्प लावून अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. बॅक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर संपूर्ण माहिती दिलेली आहे त्याची छांयांकित प्रत

**किमान पात्रता व अटी**

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

मागील वर्षी किमान ५० टक्के गुण धेवून उर्तीर्ण असावा.

अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभार्थी नसावा.

पालकांचे उत्पन्न २ लाख पेक्षा कमी असावे.

एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

अर्जदार हा मागिल वर्षीच्या वर्गात एटिकेटि धारक नसावा. उर्तीर्ण असावा.

आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्यांने आपले अर्ज प्राचार्यांच्या मार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरवला जाईल.

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांने ऑन लाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक | नविन ३०/९/२०१३ नुतनीकरण ३१/१२/२०१३ |
| ऑन लाईन भरण्यांत आलेल्या अर्जाची हार्डकॉफी विद्यार्थ्यांने महाविद्यालयास /शाळेस सादर करण्याचा अंतिम दिनांक | नविन १०/१०/२०१३ नूतनीकरण २०/१२/२०१३ |
| महाविद्यालयाने ऑन लाईन मंजूरी देण्याचा अंतिम दिनांक | नविन २०/१०/२०१३ नूतनीकरण ३१/१२/२०१३ |
| मुख्याध्यापक/प्राचार्यांनी संपूर्ण छाननी करुन संपूर्ण कागदपत्रे तपासून सहसंचालकांकडे सादर करण्यांची अंतिम दिनांक | नविन २५/१०/२०१३ नूतनीरण २५/१/२०१४ |

अधिक माहिती करिता WWW.momoscholoarship.gov.in हे संकेतस्थळ अवलोकन करावे किंवा सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग अमरावती कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे-1 यांच्या दूरध्वनी क्रमांक **020- 2 6 1 2 6 9 3 9** वर अथवा 0721-2531235 वर संपर्क साधावा.

सहसंचालक उच्च ,शिक्षण,
अमरावती विभाग अमरावती

Zope doc.